प्रेसनोट

दि.१४/९/२०१९

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | राहाता पो.स्टे.,जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| कलम | ला.प्र.का. सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | बाळासाहेब गोपीनाथ बाचकर, वय ३२ वर्ष, पोलीस नाईक, बक्कल नंबर २१४८, नेमणुक राहाता पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये १०,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ४०००/— |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांच्या मालकीचा ट्रॅक्टर असून सदर ट्रॅक्टर तक्रारदार हे शेती काम तसेच इतर कामासाठी स्वत: वापरतात. दि.१२/९/२०१९ रोजी तक्रारदार यांचा मोकळा ट्रॅक्टर आरोपी लोकसेवक बाळासाहेब गोपीनाथ बाचकर यांनी पकडला व तक्रारदार यांना तु ट्रॅक्टर मधुन वाळू वाहतूक करतो असे म्हणून ट्रॅक्टर पोलीस स्टेशनला लावून ट्रॅक्टरवर कारवाई न करण्यासाठी म्हणून त्यावेळी १०,०००/— रुपये लाचेची मागणी केली.त्यावेळी तक्रारदार यांनी आरोपी लोकसेवक बाचकर यांना कारवाईचे भीतीपोटी तात्काळ ५०००/— रुपये दिले होते. त्यावेळी आरोपी लोकसेवक बाचकर यांनी, तक्रारदार यांचे सोबत असलेले चुलत भाऊ यांच्या शर्टच्या खिशातून ६००/— रुपये काढून घेतले होते व त्यावेळी उर्वरीत ५०००/— रुपये देण्यासाठी त्याच्या हातातील चांदीचे ४ भार वजनाचे ब्रासलेट आरोपी लोकसेवक बाचकर यांनी स्वत:कडे ठेवून घेतले. आज दि. १४/९/२०१९ रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक बाळासाहेब गोपीनाथ बाचकर यांनी सदर ट्रॅक्टरवर कारवाई न केलेचा मोबदला म्हणून पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडे पुन्हा १०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ४०००/— रुपये लाचेची रक्कम दि.१४/९/२०१९ रोजी पंचासमक्ष स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in

ई—मेल :— acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :— acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :— १०६४

दुरध्वनी क्रमांक :— ०२४१—२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:— ९९३०९९७७००

16.09

(हरिष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर

Scanned by CamScanner